CIL/SE/2025-26/56
November 17, 2025

BSE Limited
P.J. Towers
Dalal Street
Mumbai- 400 001

Scrip code: 540710

National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, C-1, Block G,
Bandra Kurla Complex, Bandra (E)
Mumbai - 400 051

Symbol: CAPACITE

Sub: Newspaper Publication - Financial Results- Q2 H1 FY26

Ref: Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015

Dear Sir/ Madam,

Please find enclosed copies of advertisement of extract of unaudited standalone & consolidated Financial Results for the second quarter (Q2) and half year (H1) ended September 30, 2025, published on November 15, 2025 in following newspapers:

- The Financial Express
- Tarun Bharat

Kindly take this information on record.

This disclosure will also be available on the Company's website viz. www.capacite.in

For any correspondence or queries or clarifications, please write to cs@capacite.in

Thanking you

Yours faithfully,

For **Capacit'e Infraprojects Limited**

Rahul Kapur
Digitally signed by Rahul Kapur
Date: 2025.11.17 12:06:11 +05'30'

Rahul Kapur
Company Secretary & Compliance Officer

Encl: a/a

संघकार्यास चौफेर गतिमान करणारे कार्यकर्ते

साने गुरुजींचा प्रभाव असलेल्या वडिलांमुळे आपण समाजाचे देणे लागतो, हा विचार निशिकांत वसंत जोशी यांच्या मनात बालपणीच रुजला होता. वडिलांनंतर आईच्या संस्कारांमुळे समाजसेवेचा वारसा पुढे चालवला. सन १९७७ मध्ये संघाशी संबंध आला आणि तो अखेरच्या श्वासापर्यंत अबाधित राहिला. त्यांच्या कार्यकर्ता म्हणून झालेल्या जडणघडणीमध्ये अनेक ज्ञात-अज्ञात व्यक्तींचे योगदान होते. त्यांचे हे संबंधही अखेरपर्यंत कायम राहिले.

कै. निशिकांत वसंत जोशी हे संघ परिवारात नंदू जोशी म्हणून परिचित होते. नंदू जोशी आणि परिवार दादरला मुळे बिल्डिंगमध्ये राहात असे. खांडके बिल्डिंग नंबर ९च्या शेजारी. दि. २१ मार्च १९७७ रोजी नंदू जोशी आणि त्यांची भावंडे योजनापूर्वक त्यादिवशी जवळच लागलेल्या शाखावंरती उपस्थित राहिले. तसे पाहता शिशु आणि बाल असतानाच छबिलदास सायंशाखेशी संबंध आला होता. त्यावेळी मुळे बिल्डिंगमध्ये राहणारे श्रीनिवास जोशी (पुढे मध्य रेल्वे कर्मचारी संघाचे अखिल भारतीय कार्यकर्ते झाले) नंदू आणि त्यांच्या भावंडांना शाखेत घेऊन जात असत. तो शाखेशी आलेला पहिला संबंध. नंतरच्या कालखंडात शाखेशी संबंध दुरावला पण संघाशी संबंध होता. आणीबाणीच्या नंतर दि. २१ मार्च १९७७ला पुन्हा शाखेशी आणि संघाशी जोडले गेले.

तसे सामाजिकतेचे भान त्यांच्या कुटुंबात पहिल्यापासून होतेच. नंदू जोशींचे वडील कै. वसंत नागेश जोशी हे त्यांच्या लहानपणी अंमळनेरच्या प्रताप हायस्कूलमध्ये शिकले. ते साने गुरुजींचे विद्यार्थी असल्याने त्यांचा प्रभाव वडिलांवर होता. त्यांच्या घरातील वातावरण मोकळे होते. नंदू जोशी यांचे एक काका राष्ट्रसेवा दलाशी जोडलेले असत, तर एक काका संघाच्या शाखेत जात. १९६१ साली नंदूच्या वडिलांचे निधन झाले आणि आई इंदिरा जोशी यांनी तीन भाऊ, एक बहीण अशा चारही भावंडांना उभे केले. त्यावेळचे दादर, खांडके बिल्डिंग, बोरकरवाडी हा परिसर फार कौतुकाचा नव्हता. अशा परिस्थितीत मुलांना संस्कारित करणे हे अत्यंत कठीण काम नंदू यांच्या आईने यशस्वीपणे पार पाडले.


कै. निशिकांत वसंत जोशी

आपण समाजाचे देणे लागतो हा वडिलांचा विचार नंदू जोशींच्या आईने सर्व भावंडांवर ठसवला आणि सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे सर्व भावंडे संघाच्या कामात मार्च १९७७ पासून पुन्हा जोडली गेली. ती आजतागायत विविध कामांत सक्रिय आहेत. आणीबाणी नुकतीच उठली होती. संघाचे काम चौफेर गतिमान झाले होते. साहजिकच नंदू यांच्यावर शाखेच्या जबाबदारी बरोबरच इतरही जबाबदाऱ्या येऊ लागल्या. नंदू हे मुळातच एक समर्पित वृत्तीचे व्यक्तिमत्त्व. केईएममध्ये रेडिओलॉजी डिपार्टमेंटला १९७३ पासून कार्यरत होते. सहाजिकच वडिलांचा समाजसेवेचा वारसा त्यांनी पुढे चालवला.

केईएममध्ये असल्यामुळे देशभरातील अनेक संघकार्यकर्त्यांशी त्यांचा संबंध आला. औपचारिकतेच्या कोंदणामध्ये त्यांनी कधीच ते संबंध अडकावून ठेवले नाहीत. माणसं जोडण्याचे एक विलक्षण कसब मुळातच त्यांच्यामध्ये होते, पण संघस्पर्श झाल्यानंतर त्यांच्या या वृत्तीला आणिकच झळाळी आली. अनेकजण जोडले, त्यात विशेष म्हणजे प्रवीण तोडणकर अणि त्यांचा परिवार, अविनाश भाटकर आणि त्यांचे बंधू, प्रभाकर पाटील आणि त्यांचे कुटुंब, विजय राऊत आणि त्यांचा परिवार असे कितीतरीजण संघपरिवारात आणून उभे केले. दादरच्या मुळे बिल्डिंगमधील नंदू यांचा भला मोठा फ्लॅट आणि छोटीशी गॅलरी जणू संघाचे कार्यालयच झाले. आजचे अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते आठवणीत सांगतात, घराची किल्ली तिथेच बाजूला असे त्यामुळे कुठल्याही कार्यकर्त्याला नंदू यांच्या घराच्या दरवाजाने कधी 'नाही' म्हटले नाही.

नंदू यांचा कार्यकर्ता म्हणून जडणघडणीमध्ये अनेक ज्ञात आणि अज्ञात व्यक्तींचे निर्विवाद योगदान होते. संघाचे अधिकारी कै. सुरेशराव केतकर, कै. सदूभाऊ तथा सदानंद वैद्य, कै. मुकुंदराव पणशीकर, दुर्गानंद नाडकर्णी, कै. सुरेंद्रजी थत्ते, कै. बाबाजी देसाई, कै. भास्करराव कळंबी अशी कितीतरी मंडळी होती. एखाद्याला आपले म्हटले की, त्यांच्यासाठी जीवावरची जोखीमही नंदू जोशी घेत असे. संघाच्या कार्यामध्ये आणखीन एक त्यांचे योगदान म्हणजे शिबीर उभारणी १९८०च्या सुमारास केशवसृष्टीची जमीन संघाकडे आली आणि त्याच्या कार्याचा परीघ मोठा झाला. जमीन ताब्यात आल्यापासून नंदू आणि त्यांचे दोस्त 'केशवसृष्टी'शी जोडले गेले. सुरुवातीला त्या परिसराला 'भूतबंगला' म्हणून ओळख होती, पण संघस्पर्श झाला आणि परिसराचा चेहरामोहरा बदलला. सन १९८३ मध्ये झालेले तळजाईचे शिबीर उभारणीसाठी नंदू जोशी काही महिने तळजाईत मुक्काम ठोकून होते. तळजाई शिबिराने त्यांना खूप काही शिकवले. नंदू जोशींच्या कामांमध्ये एक सफाई एक काटेकोरपणा आखीव-रेखीवपणा असे.

'नाना पालकर रुग्ण सेवा समिती'च्या निमित्ताने कै. माधवराव परळकर, कै. गोविंदराव भिडे यांच्याबरोबर त्यांना काम करण्याची संधी मिळाली. केईएममधील अनेक डॉक्टर, नर्सेस आणि स्टाफ यांना संघपरिवाराशी जोडण्यात ते यशस्वी झाले. एकंदरीत त्यांचा माणसं जोडण्याचा छंद देशभर पसरलेला होता.

नंदू जोशींच्या घरामध्ये सर्वच कार्यकर्ते आणि त्यांचे घरच्यांचे स्वागतच होत असे. शेषाद्री चारी यांच्या मातोश्री आणि नंदू जोशींची आई या दोघी गप्पा मारीत असत. भाषेची अडचण दोघींनाही कधी जाणवली नाही, कारण दोन स्वयंसेवकांच्या माता बोलत असत. त्या दोघींचा संवाद ऐकणे म्हणजे एक गमतीदार पर्वणीच असायची. या साऱ्या प्रवासात नंदू जोशींच्या पत्नी सुनंदा जोशी यांनी सर्वार्थाने सात पावले चालण्याचे व्रत अत्यंत आत्मीयतेने पाळले. याचा परिणाम म्हणून आजही अनेक परिवार त्यांच्या घराशी जोडलेले आहेत.

'केशवसृष्टी'तील कृषी विद्यालयाच्या जडणघडणीमध्ये नंदू जोशींचे मोठे योगदान होते. आज त्यांचे कृषी विद्यालयाचे काम पुढे नेण्यामध्ये त्यांच्या पत्नी सहयोगी आहेत. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंतसुद्धा दोन-तीन दिवस आधी 'केशवसृष्टी' आणि काही कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन भेटीगाठी त्यांनी घेतल्या. जणू त्यांच्या आईने दिलेला शब्द शेवटच्या घटकेपर्यंत त्यांनी व्रत म्हणून पाळला. अनंत चतुर्दशीच्या दिवशी म्हणजेच दि. १९ सप्टेंबर २०२१ रोजी ते अनंताच्या चरणी विलीन झाले. त्यांचे कार्य नेहमी सर्वांना प्रेरणा देत राहील.

संशोधित वितरण क्षेत्र योजनेसाठी महाराष्ट्राला २,६५५ कोटी

देवेंद्र फडणवीस यांची मनोहरलाल खट्टर यांच्यासोबत बैठक

नवी दिल्ली, दि. १४ : प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल खट्टर यांची शुक्रवार, दि. १४ रोजी नवी दिल्ली येथे भेट घेत पायाभूत सुविधांच्या संशोधित वितरण क्षेत्र योजनेसाठी (आरडीएसएस) महाराष्ट्राला २ हजार, ६५५ कोटी रुपये देण्याची मागणी केली. लवकरच हा निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सोबतच आठ हजार मेगावॅट तास क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पासाठी व्यवहार्यता तूट निधी देण्यासाठीसुद्धा सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्र्यांनी दिले.

नवीनीकरणीय ऊर्जा प्रकल्पात निर्माण झालेली अतिरिक्त वीज बॅटरी स्टोरेज साठवून कमाल मागणीच्या वेळी ती वापरली जाते. यात ४ हजार, ५०० मे.वॅ. तास क्षमतेच्या अशा प्रकल्पासाठी केंद्राने यापूर्वीच व्यवहार्यता तूट निधी मंजूर केला आहे. त्याच्या निविदाही जारी करण्यात आल्या आहेत. आता अशा प्रकारचा आठ हजार मे.वॅ. तास क्षमतेचा आणखी एक प्रकल्प 'महावितरण' उभारत आहे. त्यासाठी व्यवहार्यता तूट निधी देण्यासाठी केंद्र सरकार मदत करेल, असे मनोहरलाल खट्टर यांनी सांगितले. सौरऊर्जा पारेषण जाळ्यातून नेण्यासाठीचे प्रकल्प, राज्यातील १८ मोठे सौर प्रकल्प, ग्रीडच्या तांत्रिक अडचणींवर उपाय अशा विविध विषयांवर यावेळी चर्चा झाली. या बैठकीत महाराष्ट्रातर्फे ऊर्जाक्षेत्रात हाती घेण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यात संसाधन पर्याप्तता आराखडा, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम (बीईएसएस), पंपस्टोरेज प्रकल्प इत्यादींचा त्यात समावेश होता.

या बैठकीत केंद्रीय ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, एनटीपीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गुरुदीपसिंग आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सहकार, कृषी आणि उद्योग भारताच्या विकासाचे प्रमुख आधारस्तंभ : डॉ. मोहनजी भागवत

संघशताब्दीनिमित्ताने 'उद्योजक संवाद नव्या क्षितिजाकडे' कार्यक्रम संपन्न

मुंबई, दि. १४ : विशेष प्रतिनिधी

''सहकार, कृषी आणि उद्योग हे भारताच्या विकासाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. कृषी, व्यापार आणि उद्योग यांनी परस्पर सहयोगाने आणि परस्परावलंबीपणे एकत्र प्रगती करावी,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

संघशताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित '१०० वर्षांची संघयात्रा' या मालिकेअंतर्गत, कॉन्स्टिट्यूशन क्लब जयपूर येथील पृथ्वीराज चौहान सभागृहात झालेल्या 'उद्योजक संवाद–नव्या क्षितिजाकडे' या कार्यक्रमात राजस्थानमधील प्रमुख उद्योजकांना संबोधित करत होते.

उपस्थितांना संबोधत ते म्हणाले, ''राष्ट्राला परम वैभवसंपन्न आणि विश्वगुरू बनवणे हे एका व्यक्तीच्या हातात नाही; हे सर्वांचे कार्य आहे आणि सर्वांना सोबत घेऊनच हे साध्य होईल. संघ कोणालाही नष्ट करण्यासाठी बनलेला नाही. भारतातील आपली ओळख 'हिंदू' ही आहे आणि 'हिंदू' हा शब्द सर्वांना एकत्र आणणारा आहे. आपला देश संस्कृतीच्या आधारावर एक आहे.

संघाच्या आगामी कार्याबद्दल बोलताना सरसंघचालकांनी सांगितले की, ''संपूर्ण समाज देशहितासाठी जगणे हेच संघाचे पुढील ध्येय आहे. समाजातील सज्जनशक्ती जागृत व्हावी, सामाजिक समरसतेचे वातावरण निर्माण व्हावे, मंदिर, पाणी, स्मशान हे सर्वांसाठी खुले असावे. परिवारातील सर्वांनी आठवड्यातून किमान एकदा एकत्र येऊन भोजन–भजन करावे, स्वतःच्या भाषेत–परंपरेनुसार आचरण करावे. पाणी वाचवणे, झाडे लावणे, प्लास्टिक हटवणे अशा पर्यावरण संवर्धनाच्या कामात पुढे यावे. 'स्व'चा बोध, स्वदेशीची भावना सर्वांच्या मनात जागृत झाली पाहिजे. देश स्वावलंबी बनावा. नागरिक कर्तव्य आणि अनुशासनाबद्दल आपण सजग व्हावे, नियम–कायदे–संविधानाचे पालन करावे.''

सरसंघचालक पुढे म्हणाले, ''लघु आणि मध्यम उद्योगांना आपल्या देशात चालण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे हे मोठ्या उद्योगांचे कर्तव्य आहे. लहान उद्योगांनी रोजगार, कौशल्य, उत्पादनाची गुणवत्ता आणि उत्पादन वाढवण्यावर भर दिला पाहिजे.''

मतचोरीचे 'नॅरेटिव्ह' बिहारने झिडकारले; भाजपप्रणित आघाडीचा दणदणीत विजय

(पान १ वरुन) उमेदवारांना उमेदवारी दिली होती. एनडीए आघाडीला २०० पेक्षा जास्त जागांवर विजय मिळत असल्याचे दिसते. बिहारमध्ये एकूण ६६.९१ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्यात १२१ मतदारसंघात ६५.०८ टक्के मतदान झाले, तर दुसऱ्या टप्प्यात १२२ जागांवर ६८.७६ टक्के मतदान झाले. आयोगाच्या आकडेवारीनुसार बिहारमध्ये एकूण ६६.९१ टक्के मतदान झाले.

बिहारी मतदारांनी डाव्यांना नाकारले!

२०२०च्या बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये 'सीपीआय एमएल एल' पक्षाला ११ जागी विजय मिळाला होता, तर 'सीपीआय एम आणि 'सीपीआय' यांना प्रत्येकी दोन जागांवर विजय मिळाला होता. त्यामुळे बिहार विधानसभेमध्ये डाव्या विचारांच्या प्रतिनिधींची संख्या १५ वर गेली होती. मात्र, या निवडणुकीमध्ये २० जागांवर लढणाऱ्या या डाव्या विचारांच्या पदरात बिहारी जनतेने फक्त तीन जागांचेच दान टाकले आहे. त्यामुळे शेतकरी, बेरोजगारी, गरिबी या मुद्द्यांमागे असलेल्या डाव्यांच्या राजकारणाला बिहारच्या निवडणुकांमध्ये फारसे यश आलेले दिसत नाही. देशामध्ये एकीकडे डाव्या विचारांनी प्रेरित असलेला नक्षलवाद संपुष्टात येत असतानाच, बिहारी जनतेने डाव्यांना लोकशाही व्यवस्थेमध्येही नाकारल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले.

विनोद तावडे यांचे सूचक भाष्य

''महाराष्ट्राप्रमाणे बिहारमध्येही विरोधकांचे पानिपत झाले असून भाजप प्रणित एनडीएने जवळपास २०३ जागांवर यश मिळवल्याचं चित्र आहे. आता बिहारचा मुख्यमंत्री कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जनता दलच्या कार्यकर्त्यांनी नितीशकुमार यांच्या नावाचा जप सुरू केला असला, तरी भाजपकडून मात्र वेगळी प्रतिक्रिया येत आहे. बिहारच्या यशाचे शिल्पकार समजल्या जाणाऱ्या विनोद तावडे यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत मोठं भाष्य केले आहे. मुख्यमंत्रिपदाबाबत एनडीएतील पाचही पक्ष एकत्र बसतील आणि चर्चा करतील,'' असे तावडे म्हणाले. तसेच ''हा निर्णय केंद्रीय पातळीवर घेतला जाईल,'' असंही ते म्हणाले.

तावडे म्हणाले की, ''राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्रमध्येही आम्ही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर केला नव्हता. अमित शाह यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत आधीच स्पष्ट केले की एनडीएमध्ये मुख्यमंत्रिपदाची कोणतीही व्हॅकन्सी नाही. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाचे नाव घोषित करण्याची गरज नव्हती. ''

'रफ्तार पकड चुका है बिहार' ही टॅगलाईन घेऊन निवडणुकीला सामोरे गेलो. गेल्या काही वर्षांमध्ये बिहारमध्ये विकास झाला. त्यालाच मतदारांनी पसंती दिली. एनडीएमधील घटक पक्षात प्रामाणिक संवाद ठेवला, विश्वास दिला. एखादा मुद्दा पटला नाही, तर त्यावर चर्चा करून मार्ग काढला. लोकसभेला तसा आम्ही संवाद ठेवला, आता विधानसभेलाही तीच भूमिका घेतल्याने हे यश मिळाल्याचे विनोद तावडे म्हणाले.

मोदी आणि नितीशकुमार यांनी 'जंगलराज' उद्ध्वस्त केले : ॲड. राजीवकुमार पांडे

''पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार हे दोघेही बिहारच्या सामान्य जनतेसाठी काम करत असून त्या दोघांनी मिळून 'जंगलराज' उद्ध्वस्त केले आहे,'' अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रवक्ते ॲड. राजीवकुमार पांडे यांनी दै. 'मुंबई तरुण भारत'शी बोलताना दिली.

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप–एनडीएला मिळालेल्या विजयाचे विश्लेषण करताना ॲड. राजीवकुमार पांडे म्हणाले की, ''बिहारमध्ये काँग्रेसने उचलेला 'एसआयआर'चा मुद्दा जनतेने नाकारला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीशकुमार यांचे सुशासन आणि लोककल्याणकारी कामांचा हा विजय आहे. बिहारमध्ये मोदी आणि नितीशकुमार यांची जोडी 'सुपरहिट' ठरली आहे. ते दोघेही बिहारच्या सामान्य जनतेसाठी काम करत आहेत. त्या दोघांनी मिळून 'जंगलराज' उद्ध्वस्त केले असून पुन्हा 'जंगलराज' आणण्यास जनतेने नकार दिला आहे. यावेळी बिहारमध्ये महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदान केले. या सर्व कारणांमुळे बिहारमध्ये भाजप आणि एनडीएचा दणदणीत विजय झाला आहे. भाजप आणि जदयुच्या विकासात्मक राजकारणाचा हा विजय आहे.